Dr. Ujjwala S. Deore

(2020-2021)

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625

E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S


# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

August 2020

Special Issue 252




Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts, Science & Commerce College,
Harsul, Dist - Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

This Journal is indexed in :
- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 29 | वाल्मीकि रामायण में न्याय एवं दण्ड - व्यवस्था | पंकज देवी | 144 |
| 30 | सावधान ! नीचे आग है' उपन्यास में जीवन मूल्य संक्रमण | डॉ. अशोक तायडे | 148 |
| 31 | संत तुकाराम के अभंगों की प्रासंगिकता | डॉ. बलीराम भुक्तरे | 150 |
| 32 | आदिवासींच्या अस्तित्वाचा संघर्ष | डॉ. अंजली मस्करेन्हस | 154 |
| 33 | बांबूरांझी चरातून पर्यावरण संवर्धनात्मक शाश्वत विकास | डॉ.कुंदन दुफारे, डॉ. वीणा जंबेवार | 158 |
| 34 | नागरिकत्व सुधारणा (दुरुस्ती) कायद्याचे राजकीयीकरण राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेतील अडथळा | प्रा.एकनाथ खरात | 161 |
| 35 | मराठी राजकीय कादंबरीचे संकल्पनात्मक स्वरूप | श्री. गिरीधर काचोळे | 172 |
| 36 | महिला खेळाडूंना प्रशिक्षण व क्रीडा स्पर्धा दरम्यान साहित्य व सुविधांच्या समस्याचे अध्ययन | डॉ. वंदना इंगळे, डॉ. ललिता पुन्नय्या | 180 |
| 37 | आद्य आदिवासी सेवक : ठक्कर बाप्पा | डॉ. भास्कर शेळके | 182 |
| 38 | पोवारी बोली – एक गौरव | डॉ. रामलाल चौधरी | 185 |
| 39 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक क्षेत्रातील योगदान | डॉ. माधुरी देवतळे | 190 |
| 40 | शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी योग | प्रा. भाऊसाहेब थोरात | 193 |
| 41 | शाहीर परशराम यांच्या काव्याचा जनमानसावरील प्रभाव | डॉ. संदीप सांगळे | 197 |
| 42 | ऑनलाईन शिक्षण | डॉ. सुनंदा देशपांडे | 203 |
| 43 | लोकहितवादी यांचा स्त्री सुधारणा विषयक विचार | प्रा. गणपती मोरे | 207 |
| 44 | लोकसाहित्यातील समाजदर्शन | प्रा. संदीप कोरडे | 209 |
| 45 | ज्ञानेश्वरीतील 'प्रकाश' प्रतिमा | डॉ. सौ. अलका इंदापवार | 213 |
| 46 | प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या वर्तनविषयक समस्यांचे अध्ययन (लाखनी तालुका) | डॉ. सौ. अनिता दाणी | 218 |
| 47 | माध्यम निर्मित समाज बदलासाठी बुद्ध तत्वज्ञानाची गरज : एक विश्लेषणात्मक अध्ययन | डॉ. विनोद निताळे, डॉ. सुधीर मटकर | 221 |
| 48 | जळगांव जिल्ह्यातील घटते स्त्री-पुरुष प्रमाण - रावेर तालुक्याचा क्षेत्रीय अभ्यास | डॉ. सुरेश ढाके | 229 |
| 49 | 'लोकसंस्कृती' संकल्पना | डॉ.संतोष चतुर | 234 |
| 50 | आदिवासींच्या आर्थिक समस्या | डॉ. बी. व्ही. गव्हाळे | 238 |
| 51 | मंगेश पाडगावकर यांचे काव्यलेखन | डॉ. उज्ज्वला देवरे | 246 |
| 52 | हिंदी कलात्मक चित्रपट : एक आकलन | डॉ. सुहास पाठक | 251 |
| 53 | काश्मीर प्रश्न व पाकिस्तानची वास्तविकता | डॉ. माधुरी देवतळे | 257 |
| 54 | लालन सारंग यांच्या 'जगले जशी' या आत्मचरित्रातून व्यक्त होणारा स्त्रीवाद | प्रा. अमृता डोरलीकर | 261 |
| 55 | सावित्रीबाई फुले : एक तेजस्वी तारा | डॉ. प्रेमा लेकुरवाळे | 268 |
| 56 | मारुती चितमपल्ली यांच्या साहित्यातील निसर्ग | डॉ. शकुंतला भारंबे | 272 |
| 57 | प्रसार माध्यमांची भाषाशैली : एक अभ्यास | डॉ. सुहास पाठक | 275 |
| 58 | पालक - बालक संबंधात भावना व्यवस्थापनाचे महत्त्व | डॉ. सौ. अनिता दाणी | 280 |
| 59 | भारतीय शेती : समस्या आणि उपाययोजना | डॉ. मेघा सावरकर | 283 |
| 60 | महिला लोकप्रतिनिधींचा राजकीय सभांमधील सहभाग (कर्जत तालुका) : एक विशेष अभ्यास | डॉ. चंद्रकांत गोंधळी | 288 |
| 61 | माहिती तंत्रज्ञान : मराठी अध्यापनामध्ये वापर | डॉ. ज्योती माने | 293 |
| 62 | बहुआयामी व्यक्तिमत्त्व : डॉ. वसंतराव नाईक | डॉ. गायत्री गाडेकर | 297 |




Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Special Issue - 252
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
August 2020

# मंगेश पाडगावकर यांचे काव्यलेखन

**डॉ. उज्ज्वला शिवाजी देवरे**
प्राचार्य श्रीमती पुष्पाताई हिरे कला, विज्ञान, वाणिज्य महिला महाविद्यालय
मालेगाव कॅम्प , मालेगाव,नासिक

मराठी कवितेचे दालन सुशोभित करणाऱ्या कवींमधील लखलखीत झुंबर म्हणजे मंगेश पाडगावकर यांची कविता होय. मराठी कवितेच्या केशवसुत,बालकवी ते रविकिरण मंडळाच्या कवीं नंतर बा. सी . मर्ढेकर यांनी आधुनिक कवितेचे युग निर्माण केले. मात्र मराठी कवितेतील मर्ढेकरांनंतरचे महत्त्वाचे कवी म्हणजे मंगेश पाडगावकर .

'धारानृत्य', जिप्सी', 'छोरी', 'सलाम' अशी शीर्षकाचे वेगळेपण असलेली कविता पाडगावकरांनी लिहिली. त्यांच्या "बोलगाणी"ने परभाषातही अनुवादासाठी स्थान मिळविले. स्वातंत्र्योत्तर काळात प्रदीर्घ काव्यासेवा करणारे विंदा करंदीकर आणि वसंत बापट यांच्याबरोबर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात ,भारताच्या इतर राज्यात व परदेशातही कवितांचे सादरीकरण करून मराठी कविता जनमानसात पोहोचविणारे कवी म्हणजे मंगेश पाडगावकर .इ. स. १९४९ मध्ये आचार्य जावडेकर यांचे अध्यक्षतेखाली साहित्य समेलन भरले होते. या संमेलनात ' करी माझ्या दीप उद्याचा रे'हे गीत गाऊन मंगेश पाडगावकर रसिक श्रोत्यांच्या समोर आले तेव्हा वि. द .घाटे यांनी 'हा उद्याचा कवी आहे.' अशी भविष्यवाणी केली होती .ते अगदी खरी ठरली.

पाडगावकरांनी वाचलेल्या भा. रा. तांबे, बालकवी, अनिल, कुसुमाग्रज, बोरकर यांच्या कवितांचा प्रभाव त्यांच्यावर होता. यावर स्वतः पाडगावकर म्हणतात, "बोरकर, कुसुमाग्रज, ना. घ . देशपांडे यांच्या व्यक्तिमत्वाचे संस्कार माझ्यावर झालेले आहेत. आईचे दूध पिऊन जसा मी वाढलो ,तसा यांच्या कवितेच्या अंगावरील दूध पिऊन मी वाढलो आहे ."[पृ. २३०] जिप्सी' सारखेच त्यांचे काव्यही एकसारखे नाही .त्यामुळे गाणी, गीत, बालगीते, निसर्ग कविता, प्रेम कविता, विडंबन, वात्रटिका, गझल त्यांनी लिहिले .

'धारानृत्य 'मधील कवितांमध्ये आत्मनिष्ठा प्रबळ होती,ती बोरकर,कुसुमाग्रजांच्या -विशेषतः बोरकरांच्या -कवितासदृश्य भासत होती. मात्र त्यावेळी पाडगावकरांचे कविमन आकार घेत होते. कवितेच्या भावविश्वात हरवून जाताना अप्रत्यक्षपणे बोरकरांचा बाज धारण करीत होते. स्वतःचे कल्पनाविश्व त्यांची कवी प्रतिभा शोधात होती.ते कल्पनाविश्व त्यांना "जिप्सी "मध्ये सापडले. याविषयी वा. ल. कुलकर्णी म्हणतात,"आपले वैयक्तिक प्रेम जीवन आणि निसर्ग-प्रेमातून अनुभवास येणारे भाव जीवन हेच आज पाडगावकरांच्या प्रतिभेचे प्रामुख्याने चिंतन विषय आहेत .आज त्यांची कक्षा एवढ्यापुरतीच मर्यादित आहे."["जिप्सीच्या "निमित्ताने, पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना पृ. तेरा, जिप्सी नववी आवृत्ती १० मे १९९४] कवीने पाहिलेले, रचलेले जग हे सुंदर आहे,कवीचे मन त्या जगाकडे ओढ घेत आहे. पाडगावकरांची जिप्सी "सौंदर्यव्रती जिप्सी आहे.

वडिलांची आर्थिक स्थिती चांगली असल्यामुळे आपण काहीही काम न करता आरामात जीवन जगू हा भ्रम विवाहानंतर व मुले झाल्यानंतर दूर झाला. अर्ध्यात सुटलेले शिक्षण ;त्यामुळे चांगली नोकरी नाही. वयाच्या २७ व्या वर्षी पदरी दोन अपत्य असताना पाडगावकरांनी कॉलेजला प्रवेश घेतला. ते पदवीधर झाले



Scanned with OKEN Scanner

तेव्हा त्यांचे धारानृत्य ,जिप्सी,छोरी हे काव्यसंग्रह प्रकाशित झालेले होते. पाडगावकर पदव्युत्तर शिक्षण करीत असताना त्यांचा 'निंबोणीच्या झाडामागे' हा लघुनिबंध संग्रह आणि 'जिप्सी' हा काव्यसंग्रह बी. ए. च्या अभ्यासक्रमात लागले होते.

प्रपंच आणि काव्यलेखन बहरात येत असताना स्वच्छंदी मनमोकळे आयुष्य बंदिस्त होत जाते हे त्यांच्या कवितेतूनही जाणवते. ---

माग हवे ते गडे तू
माझे पंख मागू नको. .....

अशी परिस्थिती निर्माण होते.

प्रत्यक्ष व्यवहार किंवा जगण्याच्या कल्पना आणि कवी कल्पना यांचा पुष्कळदा काहीही संबंध नसतो. तसाच पाडगावकरांचे भावविभोर कविता, गाणे व त्यांचे प्रत्यक्ष जीवन यांत सारखेपणा दिसत नाही.

झुले बाई झुला
दिवस तुझे हे फुलायचे
झोपाळ्यावाचून झुलायचे

या कविता लिहिणाऱ्या पाडगावकरांनी मुलांना कधीच झोका बांधून दिला नाही.कारण मुले त्यावरून पडतील असे त्यांना वाटे. तसेच एवढे भाव व्याकुळ लेखन करणारे पाडगावकर संसार करताना घरात रुक्ष व अलिप्त वागतात असे त्यांच्या पत्नी यशोदा पाडगावकर यांच्या पुढील अवतरणावरून स्पष्ट होते.त्या लिहितात,"त्याच्या कल्पनेतल्या भराऱ्या अगम्य ठिकाणी जाऊन घिरट्या घालत असत आणि मी आलेल्या परिस्थितीला शरीरानं व मनानं एकटीच घाबरून झुंज देत चालले होते .माझ्या सध्याच्या जीवनाशी सुसंगती नसणाऱ्या कवितांबद्दल मला आपुलकी वाटेनाशी झाली .खरं तर ही दोन जग वेगवेगळी आहेत हे कळत असूनही त्याचं जग वेगळं आणि माझं जग वेगळं होत चाललं .माझ्या सुखदुःखाशी तो समरस होईनासा झाला. खरं तर आधीपासून फारसा नव्हताच. "( कुणास्तव कुणीतरी-यशोदा पाडगावकर )

त्यांच्या बालगीतांमध्ये सौंदर्यात्मक विश्वाची,परिपूर्ण जगाची प्रेरणा आहे."नवा दिवस"हा काव्यसंग्रह त्यांनी १३ ते १६ या वयोगटातील मुलांसाठी लिहिला.

फुलावरती
कोणाचं का नाव असतं ?
प्रत्येक फूल
फुलपाखराचं गाव असतं! ( आपलं गाणं गात राहावं ,नवा दिवस ,२)

लहान मुलांची निरागसता त्यांच्याच शब्दांत या काव्यसंग्रहात व्यक्त झालेली दिसते. बालकविता,मनोवेधक भावकविता लिहिणारे पाडगावकर पुढे त्यांच्या विडंबनांतून ,वात्रटिकांतून,उदासबोधासारख्या इतर काव्यसंग्रहांतून जागतिक " कुरूपतेची "जाणीव करून देऊन ती मिटवू पाहण्याची प्रेरणा देताना दिसतात. अनेक तऱ्हेने काव्यलेखन करून पाडगावकरांची सौंदर्यवृत्ती सदैव ताजी टवटवीत वाटते.मात्र जीवनातील कुरूपता, व विकट ता पाहून ही वृत्ती खंतावते .अशा वृत्तीतून वरील काव्यसंग्रह निर्माण झाले. पाडगावकर "विदूषक"च्या प्रस्तावनेत म्हणतात," एकाच वेळी विकट आणि आर्त अशा या अनुभवांचे जसे जबरे तसेच त्याच भाषेतील आविष्काराचे आव्हान विकट आहे."



Scanned with OKEN Scanner

या संग्रहांतून केवळ टिंगल टवाळी करणे हे पाडगावकरांचे हेतू नाहीत तर विनाशकारी शक्तींचे भयावह दर्शन करून द्यावयाचे आहे. आत्मनाशाचे,एकाकीपणाची, आवर्त प्रामाणिक,सामान्य माणसाला कसे चिरडून टाकते ते उपहासाने सांगतात. ---

रामाच्या देवळामागे
हातभट्टीची धून लागे
शेपटी घालून चालू लागे
हनुमान कोणी भ्यालेला (उदासबोध पृ.८२ ) "शर्मिष्ठा"काव्यसंग्रहातील पुढचा संवाद --
पाहतोस का डोळे उघडून
जीवन म्हणजे सौंदर्याची यात्रा ....(शर्मिष्ठा -पृ. ९१)

हा सिद्धांत स्पष्ट होतो .नवकवींनी यंत्रयुगाच्या जीवनातील निसर्गाचे दर्शन प्रतिमांच्या माध्यमांतून घेतले. या जगातील दुःख, निराशा,मूल्यविहीनता पाहून व हे सर्व विसरण्यासाठीच जणू तो निसर्गाशी संवाद करतो. पाडगावकरांचा निसर्गही हेच सांगतो.--

मनी अकारण कळवळले जळ
कसली तळमळ ? कशास विव्हळ
करीत सळसळ व्याकुळ पिंपळ आठवितो गतकाळ
ही उदास संध्याकाळ -----(जिप्सी-पृ. ३८)

आपली कविता एका साच्यात बसलेली पाहून त्या साच्यातून बाहेर पडावे अशी पाडगावकरांच्या कवितेला ओढ वाटली .काव्य जीवनाचे नवे संक्रमण करताना त्यांनी काही उद्देशिका ,सुनीते, व्यक्तिचित्रात्मक कविता असे रचनाप्रकार लिहिले .तर एक नवा आकृतिबंध "बोलगाणी"च्या स्वरूपात लिहिला. याबद्दल ते म्हणतात,"बोलता बोलता गाणं रचणं असा हा प्रकार आहे .स्पीच रिदम चा अविष्कार "---

समूहात बसून हि गाणी
ऐकावीशी वाटली तर
त्यात काय चूक आहे ?
शब्दांचं नादरूप
असं मिळून भोगणं ही
प्रत्येकाची अटळ अशी भूक आहे.

रसिकांशी थेट संवाद साधण्याचे तंत्र व कौशल्य या प्रकारात आहे.बोलणे आणि तसे लिहिणे व शेवटी त्याला गाण्यासारखे ध्रुवपद जुळवणे असे "बोल गाण्या"चे स्वरूप आहे.

सांगा कसं जगायचं ?, प्रेम म्हणजे प्रेम असतं -----या बोल गाणी मधील लोकप्रिय कविता आहेत . पाडगावकर समूहापुढे असलेले कवी आहेत या जाणिवेने त्यांची कविता जशी वाचनीय आहे तशीच ती श्रवणीयही आहे. "बोल गझल हा नवा काव्यप्रकार त्यांनी शोधून काढला. या संदर्भात मर्ढेकर म्हणतात,"शब्दांवर थोडी हुकूमत असली आणि लय अंगवळणी पडली म्हणजे लिहिणं फारसे कठीण नसत." (बा. सी. मर्ढेकर. काहीं कवितांचे प्रास्ताविक ,मर्ढेकरांची कविता ,मौज .मुंबई १९५९,पृ. १६६) मंगेश पाडगावकर यांनी "गझल"या फारशी भाषेतून आलेल्या काव्यप्रकारात लेखन करून आपल्या आसुसलेल्या मनस्थितीचेही चित्रण केले आहे .

कोलाहलात साऱ्या माणूस शोधतो मी
गर्दीत माणसांच्या माणूस शोधतो मी



Scanned with OKEN Scanner

E-ISSN :
2348-7143
August 2020

असा प्रारंभ करून माणूस कुठे कुठे असायला हवा होता आणि तो तिथे कसा नाही याच्या नोंदी करतात . धर्म,देवळे,सुख,वासना, जळती चिंता, वेश्यावस्ती ,धनिकांच्या वस्त्या,झोपड्या इ .ठिकाणी माणूस दिसायला हरकत नव्हती .परंतु कावीळ माणूस तेथे सापडत नाही .म्हणजेच माणसाचे माणूसपण न मिळणे --- ही कल्पना कवी करताना वेगवेगळ्या घटनांचे तपशील देतो.

"गझल"लिहिताना पाडगावकरांनी कविप्रकृती आणि समाज जीवनातील त्याला विरोधी असणारे कटू वास्तव यातील विरोध प्रकट केला आहे. गझल मध्ये विरोधाभास असतो पण तो जोरकसपणे पाडगावकरांच्या गझलेत प्रकट झालेला नाही .डॉ. नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, "रविकिरण मंडळाच्या कवितेत ज्या कारणांमुळे आवर्त निर्माण झाले नेमके त्याच कारणांसाठी पाडगावकरांची गझल फारशी यशस्वी झाली नाही असेच म्हणावे लागेल. "( मराठी कविता:आकलन आणि आस्वाद -डॉ .नागनाथ कोत्तापल्ले "मंगेश पाडगावकर यांच्या गझलच्या निमित्ताने,१०५)मात्र काही चांगले "शेर" ही पाडगावकरांच्या लेखणीने दिले आहेत .ते खालीलप्रमाणे--

दाणे मला सुखाचे हे घातलेत ज्यांनी
मी पन्खशून्य स्वामी माझ्याच पिंजर्याचा(४१)
घोषणा त्यांनी दिल्या जेव्हा स्मशानापुढे
ऐकुनी त्या बांधलेले प्रेतही संतापले (८१)

मंगेश पाडगावकरांनी ६० वर्षांहून अधिक काळ साहित्य लेखन केले. त्यात त्यांचे धारानृत्य, जिप्सी,छोरी,सलाम,तुझे गीत गाण्यासाठी यांसह ३३ काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत . तीन भाषांतरित नाटके,ललित लेख, निबंध संग्रह असे विविधांगी लेखन,विद्यापीठ गीते, अनुवाद केलेल्या साहित्यात निबंध, कथा, कविता, कादंबरी, नाटक, इतिहास, चरित्र, आत्मचरित्र असे साहित्याचे अनेक प्रकार व विषयांचा समावेश आहे.तसेच भारतीय प्राचीन कवी-मीराबाई, कबीर सुरदास यांच्या निवडक पदांचे अनुवादही केले आहेत. पैकी मीराबाईच्या काव्य पाडगावकरांनीच प्रथम मराठीत उपलब्ध करून दिले. कविता फक्त लिहून ती पुस्तकबंद न करता कवितेच्या सादरीकरणाचे असंख्य प्रयोग विंदा करंदीकर व वसंत बापट यांच्या समवेत देश विदेशात सादर करून मराठी कविता रसिकांच्या मनामनात पोहोचविली. मंगेश पाडगावकरांनी ६० वर्षांहून अधिक काळ साहित्य लेखन केले. त्यात त्यांचे धारानृत्य, जिप्सी, छोरी, सलाम, तुझे गीत गाण्यासाठी यांसह ३३ काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत . तीन भाषांतरित नाटके,ललित लेख ,निबंध संग्रह असे विविधांगी लेखन,विद्यापीठ गीते ,अनुवाद केलेल्या साहित्यात निबंध, कथा, कविता, कादंबरी, नाटक, इतिहास, चरित्र, आत्मचरित्र असे साहित्याचे अनेक प्रकार व विषयांचा समावेश आहे.तसेच भारतीय प्राचीन कवी-मीराबाई, कबीर सुरदास यांच्या निवडक पदांचे अनुवादही केले आहेत. पैकी मीराबाईच्या काव्य पाडगावकरांनीच प्रथम मराठीत उपलब्ध करून दिले. कविता फक्त लिहून ती पुस्तकबंद न करता कवितेच्या सादरीकरणाचे असंख्य प्रयोग विंदा करंदीकर व वसंत बापट यांच्या समवेत देश विदेशात सादर करून मराठी कविता रसिकांच्या मनामनात पोहोचविली.

या दीर्घ कालखंडाच्या आयुष्यात मंगेश पाडगावकरांना अनेक मानसन्मान मिळाले. ते पुढीलप्रमाणे -

**अध्यक्ष** - मराठी बालकुमार साहित्य संमेलन, संगमनेर.इ.स. २०१०

**अध्यक्ष**- विश्व साहित्य संमेलन इ.स. २०१०



Scanned with OKEN Scanner

E-ISSN : 2348-7143
August 2020

पुरस्कार—

1. साहित्य अकादमी पुरस्कार [इ.स. १९८०-सलाम काव्यसंग्रहाला]
2. महाराष्ट्र भूषण पुरस्कार [२४/११/२००८]
3. पदमभूषण पुरस्कार[ इ.स.२०१३]
4. मराठी साहित्य परिषदेचा "मसाप सन्मान पुरस्कार इ.स. २०१३]
5. मुंबईतील एका चौकाला "मंगेश पाडगावकर चौक" असे नाव दिले.

इ.स .२०१५ मध्ये पाडगावकरांचे निधन झाले.



Scanned with OKEN Scanner